मांजरा धरण धनेगांव, ता.केज, जि.बीड या उपविभागीय कार्यालयाचे मुख्यालय अंबाजोगाई येथे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: आढावा-२०१७/प्र.क्र.७४/२०१७/आ(प्रशि),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०३ जानेवारी, २०१८

प्रस्तावना :

डाव्या कालव्यावरील केज व रेणापुर या दोन तालुक्यांचे मध्यवर्ती ठिकाण अंबाजोगाई लक्षात घेता व उपविभागीय कार्यालय जिल्हा मुख्यालयाएवेजी क्षेत्रिय स्तरावर असणे प्रशासकीय दृष्ट्या सोयीचे असल्याने मांजरा धरण धनेगांव, ता.केज, जि.बीड या उपविभागीय कार्यालयाचे मुख्यालय लातूर येथून अंबाजोगाई येथे स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अधिनस्त मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद अधिनस्त अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड अधिनस्त कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.१, लातूर अंतर्गतच्या मांजरा धरण धनेगाव, ता.केज, जि.बीड या उपविभागीय कार्यालयाचे मुख्यालय लातूर येथून अंबाजोगाई येथे स्थलांतरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) स्थलांतरीत उपविभागीय कार्यालय मूळ कार्यभारासह व मंजूर पदांसह स्थलांतरीत मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत राहील.
२) स्थलांतरीत उपविभागीय कार्यालय शासकीय जागेतच कार्यान्वित करण्यात यावे, त्यासाठी बांधकामाचा वेगळ्याने खर्च करु नये. तसेच सध्याच्या कार्यरत उपविभागातील उपलब्ध साहित्याचाच वापर करण्यात यावा.
३) प्रशासकीय व आस्थापना खर्चात वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

२. उपविभागीय कार्यालयाच्या मुख्यालय बदलानुसार सदर कार्यालय दिनांक १५ जानेवारी, २०१८ पासून अंबाजोगाई येथे शासकीय जागेत कार्यान्वित होईल यादृष्टीने मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद तसेच, अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांनी आवश्यक ती सर्व कार्यवाही तात्काळ करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०३१४५५२८८०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Prashant Jagdish Sajanikar

Digitally signed by Prashant Jagdish Sajanikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a8cd67058795ac5a961c2b41207cb6d24b79e17716af754c9fc40fd4145416f1, serialNumber=217003e42c820ec29c89162937f98929453cc6295b34f71ea285041053a66aa7, cn=Prashant Jagdish Sajanikar
Date: 2018.01.03 15:01:33 +05'30'

(प्रशांत साजणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४) मा.मंत्री (खारजमीन) यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६) मा.विधानसभा/ विधान परिषद सदस्य (सर्व).
७) प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
११) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर.
१२) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे / सर्व महासंचालक.
१४) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
१६) मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद.
१७) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड.
१८) आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) अधीक्षक अभियंता, ई-प्रशासन मंडळ, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई. (कार्यालयांच्या बदलाची आवश्यक ती नोंद घेण्यास्तव)
२०) कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.१, लातूर.
२१) उप अभियंता, मांजरा धरण धनेगांव, ता.केज, जि.बीड
२२) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) आस्थापना (प्रशिक्षण) संग्रहार्थ.